सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४९ | शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १,५०,००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १,३९,५०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १,१६,५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २,३८०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन



डॉ. स्वप्नील बडगुजर
अमळनेर



श्री. पंडितराव पाटील
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!



श्रावणातील शुक्रवारी का केले जाते **कुंकुमार्चन ?**

पान ४

# श्री मंगळग्रह देवांचा पंचामृतासह झाला रुद्राभिषेक

## पूर्णाहुतीसाठीची तयारी पूर्ण : मनोहारी सजावटीचा असंख्य भाविकांनी घेतला आनंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात राष्ट्रकल्याण, संरक्षण, समृद्धी तसेच संस्थेच्या विविध संकल्पपूर्तीनिमित्त आयोजित तीन दिवसीय भव्य महारुद्र अभिषेक पूजेला काल बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी सुरूवात झालेली आहे. प्रधान आचार्य तथा वेदमूर्ती श्री. केशव पुराणिक गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चैतन्यमय, भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात आज गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास द्वितीय दिवसातील पूजा सुरू झाली. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले यांच्या शुभ हस्ते या विशेष धार्मिक सोहळ्यातील परम पवित्र अनुष्ठान कार्य सुरू आहे. मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे प्रथमच ही तीन दिवसीय भव्य महारुद्र पूजा होत आहे. या महापूजेची शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता पूर्णाहुती होऊन सांगता होणार आहे.

महापूजेत प्रारंभी गणपतींचे स्मरण करण्यात येऊन लोककल्याणासाठी उपसंकल्प करण्यात आला. तसेच काल स्थापित केलेल्या देवतांचे पूजन झाले. यामध्ये गणपती पूजन, वरुण देवता पूजन, मातृका पूजन तसेच न्यास करून श्री मंगळग्रह देवांच्या महारुद्र पूजेचा संकल्प सोडण्यात आला. श्री मंगळग्रह देवांची विविध सुगंधी द्रवांसह पंचामृत व रुद्र अभिषेक तसेच देवांची शृंगार पूजा करण्यात आली. दुपारी स्थापित देवतांचे सायंपूजन करण्यात आले. काही रुद्र आवर्तने झाली. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता महाआरती झाली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. अशा तऱ्हेने द्वितीय दिवसाच्या महापूजेची सांगता झाली. दरम्यान, दुपारी जळगाव विमानतळाचे प्रमुख (डायरेक्टर) मा. श्री. हर्षकुमार त्रिपाठी यांनी महारुद्र पूजास्थळी काही वेळ पूजा-अर्चेत सहभाग घेतला.

वेदमूर्ती व्यंकटेश कळवे गुरुजी, सारंग पाठक, अथर्व कुलकर्णी, शुभम वैष्णव, यश जोशी, चंद्रकांत जोशी, परशुराम शर्मा, तुषार दीक्षित, प्रसाद भंडारी, जयेंद्र वैद्य, मंदार कुलकर्णी, वैभव लोकाक्षी, अक्षय जोशी, गणेश जोशी, पवन शर्मा, विनोद पाठक, दिव्येश जोशी, शैलेश जोशी, उमेश पंचभाई, निलेश रोडे, हेमंत गोसावी, गौरव मिश्रा, सूरज मिश्रा, मनजीत मिश्रा व हरिओम शुक्ल हे पौरोहित्य करीत आहेत. त्यांना उमेश पाठक, प्रवीण भंडारी, चेतन नाईक सहकार्य करीत आहेत.

**'श्री अष्टोत्तरशत लिंगतोभद्र मंडल'ची आकर्षक रेखाटणी**

तीन दिवसीय महारुद्र पूजेच्या पूर्णाहुतीसाठीची तयारी रात्री पूर्णत्वास आली. यामध्ये भगवान शंकरांचे १०८ लिंग आणि त्यांच्याशी संबंधित शिवशक्तींची स्थापना केलेले 'श्री अष्टोत्तरशत लिंगतोभद्र मंडल' आकर्षकपणे श्री मंगळग्रह मंदिराच्या समोरील सभामंडपात विविध रंगांतील तांदळात रेखाटून संपूर्ण परिसर फूलमाळांद्वारे सजविण्यात आले आहे. हे सनातन धर्मशास्त्रातील आणि वेदोक्त कर्मकांडातील अत्यंत उच्च कोटीचे, पवित्र आणि शक्तिशाली तांत्रिक-वैदिक मंडल मानले जाते. जेव्हा मोठ्या प्रमाणावर याग, महायज्ञ, रुद्रयाग किंवा विशेष शिव अनुष्ठान केले जाते तेव्हा वेदीवर विविध रंगांच्या तांदळाने किंवा धान्याने हे मंडल रेखाटले जाते. त्याच ठिकाणी भगवान शिवशंकर व माता पार्वती यांच्याही प्रतिमा आकर्षक रूपात उभारण्यात आलेल्या आहेत. अनेक भाविकांनी या मनोहारी मांडणीचे फोटो मोबाईलमध्ये टिपले आहे.

**अयोध्या, प्रयागराजच्या पुरोहितांचाही सहभाग**

मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात प्रथमच आयोजित तीन दिवसीय महारुद्र पूजेसाठी अयोध्या व प्रयागराज येथून खास पुरोहित निमंत्रित आहेत. यामध्ये गौरव मिश्रा, सूरज मिश्रा, मनजीत मिश्रा व हरिओम शुक्ल यांचा समावेश आहे.



अमळनेर : महारुद्र पूजेचे विशेष यजमान मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले तसेच महापूजेचे प्रधान आचार्य तथा वेदमूर्ती श्री. केशव पुराणिक गुरुजी यांच्यासमवेत वेदमूर्ती व्यंकटेश कळवे गुरुजी, सारंग पाठक, अथर्व कुलकर्णी, शुभम वैष्णव, यश जोशी, चंद्रकांत जोशी, परशुराम शर्मा, तुषार दीक्षित, प्रसाद भंडारी, जयेंद्र वैद्य, मंदार कुलकर्णी, वैभव लोकाक्षी, अक्षय जोशी, गणेश जोशी, पवन शर्मा, विनोद पाठक, दिव्येश जोशी, शैलेश जोशी, उमेश पंचभाई, निलेश रोडे, हेमंत गोसावी, गौरव मिश्रा, सूरज मिश्रा, उमेश पाठक, प्रवीण भंडारी व चेतन नाईक.



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे प्रथमच श्री मंगळग्रह मंदिरात लोककल्याणासाठी आयोजित तीन दिवसीय भव्य महारुद्र पूजेच्या अनुष्ठान कार्याप्रसंगी गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी दुपारी काही वेळ पूजा-अर्चेत सहभाग नोंदवत श्री मंगळग्रह देवांचे दर्शन घेताना जळगाव विमानतळाचे प्रमुख (डायरेक्टर ) मा. श्री. हर्षकुमार त्रिपाठी.



पूर्णाहुतीसाठी श्री मंगळग्रह मंदिरासमोरील सभामंडपात विविध रंगांतील तांदळात रेखाटून संपूर्ण परिसर फूलमाळांद्वारे आकर्षकपणे सजविण्यात आलेले १०८ शिवलिंग आणि त्यांच्याशी संबंधित शिवशक्तींची स्थापना केलेले 'श्री अष्टोत्तरशत लिंगतोभद्र मंडल'. (छायाचित्रे : नितेश बारी)

## आज दुपारी होणाऱ्या पूर्णाहुतीप्रसंगी अवश्य उपस्थित राहा...!

भगवान श्री मंगळग्रह देवांची आपल्यावर पूर्ण कृपा व्हावी, सर्वांचे रक्षण व भले व्हावे, या मुख्य उद्देशाने श्री मंगळग्रह मंदिरात अलौकिक अशी महापूजा सुरू आहे. हल्ली जगामध्ये अनावृष्टी सुरू आहे. कुठे पाऊसच पडत नाही. तर कुठे अति पाऊस पडून जलप्रलय होत आहे. अनेक ठिकाणी भयंकर आगींमध्ये अनेकजण होरपळत आहेत. काही ठिकाणी भूकंप, ज्वालामुखी आणि उल्कापातामुळे अनेकांना जीव गमवावा लागत आहे. जगावर तिसऱ्या महायुद्धाचे सावट आले आहे. अतिरेकी व देशद्रोह्यांमुळे देशाचे मोठे नुकसान होत आहे. हे जे सर्व इतिभय चालले आहे त्यातून आपल्या परम पवित्र मातृभूमीचे रक्षण व्हावे तसेच जगाचेही कल्याण व्हावे, यासाठी या 'महारुद्र स्वाहाकारा'मध्ये श्री मंगळग्रह देव आणि भगवान शंकर यांची आपण आराधना करीत आहोत. मंगळग्रह सेवा संस्था नेहमी विविध स्तुत्य उपक्रम या ठिकाणी राबवत असते. त्यातीलच हा तीन दिवसीय उपक्रम आहे. महारुद्र अभिषेक पूजेत श्री मंगळग्रह मंदिरातील स्वयंभू अतिजागृत मूर्तीवर ११ लघुरुद्र (१३३१ रुद्र आवर्तने) होतील. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता श्री मंगळग्रह देव मंदिरातील स्थापित सर्व देवतांसाठीचे हवन, बलिदान व पूर्णाहुती होईल. कोणत्याही महायागात पूर्णाहुतीला अनन्य साधारण धार्मिक महत्व असते त्यामुळे आपण सकाळी ९ ते दुपारी २ असे पूर्णवेळ थांबलात तर उत्तमच. अन्यथा किमान दुपारी दीड ते दोन यावेळेत भाविकांनी या परमपवित्र व अलौकिक महापूजाप्रसंगी उपस्थित राहावे, असे कळकळीचे



अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सायंकाळी बैलपोळा साजरा झाला. बैलांचे पाय धुऊन, अंगावर शाल व पुष्पहार अर्पण करून विधीवत पूजनानंतर त्यांना गोड घास भरविण्यात आला. यावेळी उपस्थित पूजेचे मानकरी प्रा. प्रकाश पाठक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त अभियंता संजय सोनवणे, निवृत्त उपविभागीय अभियंता सतीश वारुळे, अमोल पाठक, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील आदी.

# चोपडा रस्त्यावर श्री मंगळग्रह मंदिराजवळ तत्काळ गतिरोधक बसविण्याची मागणी

### मंगळग्रह सेवा संस्थेने दिले सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चोपड्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरून श्री मंगळग्रह मंदिराकडे वळताना गेल्या काही दिवसांपासून अनेक वाहनांचे अपघात होत आहेत. त्यात अनेकजण जखमी होत आहेत. काही घटनांमध्ये जीवितहानीही झाली आहे. या रस्त्यावरून दिवस-रात्र वाहतूक सुरू राहत असल्यामुळे तत्काळ या ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदनही दिले आहे.



निवदेनात म्हटले आहे, की येथील चोपडा रस्त्यावरून श्री मंगळग्रह मंदिराकडे वळताना गेल्या काही दिवसांपासून अनेक वाहनांचे अपघात होत आहेत. त्यात अनेकजण जखमी होत आहेत. तसेच वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही घटनांमध्ये जीवितहानी झाल्याचेही प्रकार घडले आहेत. सदर रस्ता अतिशय वर्दळीचा आहे. त्याचप्रमाणे श्री मंगळग्रह मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असते. त्यापैकी अनेकजण दुचाकी व चारचाकी वाहनांनी येतात. त्यामुळे मंदिराकडे वळताना रस्त्यावर दोन ठिकाणी गतिरोधक असणे अत्यंत गरजेचे आहे. संभाव्य गंभीर स्वरूपाचे अपघात तथा जीवितहानीचा धोका लक्षात घेता कृपया सदर रस्त्यावर तत्काळ गतिरोधक बसवून वाहनधारकांची गैरसोय दूर करून अपघात थांबवावेत.




# खासदार स्मिताताई वाघ यांना सलग दुसऱ्यांदा 'संसदरत्न'

### राष्ट्रीय पातळीवर जळगावच्या जनतेच्या विश्वासाला मानाची पावती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार श्रीमती स्मिताताई वाघ यांना प्रतिष्ठेचा 'संसद रत्न पुरस्कार २०२६' नुकताच नवी दिल्लीत प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना सलग दुसऱ्यांदा मिळाला आहे. संसदेतील प्रभावी उपस्थिती, जनहिताचे प्रश्न सातत्याने मांडणे आणि लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर खासदार श्रीमती वाघ यांनी हा गौरव केवळ वैयक्तिक नसून जळगाव लोकसभा मतदारसंघातील जनतेने दाखविलेल्या विश्वासाचा सन्मान असल्याचे सांगितले. संसदेत उपस्थित केलेले प्रश्न, विकासकामांसाठी केलेल्या मागण्या आणि जनहितासाठी घेतलेले विविध पुढाकार यामागे मतदारसंघातील नागरिकांच्या अपेक्षा व समस्या केंद्रस्थानी असल्याचे त्यांनी नमूद केले तसेच गतवर्षी मिळालेल्या पहिल्या 'संसद रत्न' सन्मानाने अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा दिली. सलग दुसऱ्यांदा मिळालेल्या या पुरस्कारामुळे जनतेप्रती असलेली जबाबदारी आणखी वाढली आहे, असेही सांगितले.

पान २ वर

# अमळनेरमध्ये २१ सप्टेंबरला तालुकास्तरीय लोकशाही दिन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नागरिकांच्या विविध समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी येथील तहसील कार्यालयात सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनात नागरिकांना आपल्या समस्या, तक्रारी व मागण्यांबाबत अर्ज सादर करता येणार आहेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार, अमळनेर यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. याबाबतचे पत्र तहसीलदार कार्यालय यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

## संपादकीय

### शिस्तीचा ‘महाप्रसाद’

राज्यात हजारोंच्या संख्येने आयोजित करण्यात येणाऱ्या अशा भोजन कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवणे, हे विभागापुढील मोठे आव्हान ठरेल. विशेषत: त्याच्या नियमावलीत अनेक कठोर मुद्द्यांचा समावेश असून, त्या नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वसामान्य-गोरगरीब वर्गासाठी अडचणींचे ठरू शकते. हॉटेल आणि दुकानांपाठोपाठ महाप्रसाद-भंडारा, इफ्तार आणि लंगर येथे वाढल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांचीही तपासणी करण्याचा अन्न व औषध प्रशासनाचा (एफडीए) नवा निर्णय विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडाकेबाज कार्यशैलीला साजेसाच आहे; मात्र त्यापुढील अनेक व्यावहारिक अडचणी पाहता या निर्णयाची अंमलबजावणी कशी करणार, हा मोठा प्रश्न आहे. अशा सामूहिक भोजन कार्यक्रमांच्या स्थळी स्वच्छता असावी आणि तेथे नागरिकांना भेसळयुक्त किंवा अनारोग्यकारक अन्नपदार्थ मिळू नयेत, या त्यामागील उद्देश. मात्र, राज्यात हजारोंच्या संख्येने आयोजित करण्यात येणाऱ्या अशा भोजन कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवणे, हे विभागापुढील मोठे आव्हान ठरेल. विशेषत: त्याच्या नियमावलीत अनेक कठोर मुद्द्यांचा समावेश असून, त्या नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वसामान्य-गोरगरीब वर्गासाठी अडचणींचे ठरू शकते. राज्यात सर्वधर्मीयांच्या सण-उत्सवांत आयोजित भंडारा किंवा महाप्रसादाच्या कार्यक्रमांमध्ये त्यातून काही विघ्न उभे राहिलेच, तर ते तणावाला निमंत्रण ठरू शकते. त्यामुळे या आघाडीवर जपूनच पावले उचललेली बरी.

आपल्या सर्वधर्मीय संस्कृतीमध्ये अन्नदानाला मोठे महत्त्व आहे. त्यामुळे अनेक देवस्थाने-गुरुद्वारा अशा सर्वधर्मीय संस्थांमधून महाप्रसाद-लंगर नित्यनेमाने सुरू असतात. तेथील भोजनावर आता ‘एफडीए’ची नजर राहणार आहे. खरे तर अन्नसुरक्षा व मानक प्राधिकरणाच्या (एफएसएसएआय) वतीने पूर्वीच त्याबाबत मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, देशातील मोठ्या देवस्थानांमधून प्रसादाची नियमित तपासणीही केली जाते. मात्र, रस्त्यांवर-गल्लीबोळांमध्येही आयोजिण्यात येणारे भंडारा-महाप्रसाद, लंगर किंवा इफ्तारची तपासणी करण्याचा निर्णय मुंढे यांनी जाहीर केला आहे. सण-उत्सवांच्या काळात अशा मोहिमा आखण्याऐवजी त्यासाठी वर्षभराचे ‘फेस्टिव्हल एन्फोर्समेंट कॅलेंडर’च त्यांनी तयार केले आहे. नव्या नियमावलीनुसार अशा सामूहिक भोजन कार्यक्रमासाठी सात दिवस आधी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक ठरवण्यात आले आहे. त्याशिवाय अशा कार्यक्रमांना फक्त परवानाधारक केटरर्सकडूनच स्वयंपाक करून घेण्याचा नियमही करण्यात आला आहे. त्याशिवाय अन्नपदार्थांसाठी आणलेल्या कच्च्या मालाची पक्की बिले जपून ठेवावी लागतील. अशा कार्यक्रमांमध्ये ‘एफडीए’ च्या पथकांमार्फत अचानक तपासणीही करण्यात येईल आणि त्रुटी आढळल्यास थेट गुन्हे दाखल करण्यापर्यंतची कारवाई होऊ शकेल.

काही ठिकाणी सामूहिक भोजन किंवा प्रसादातून विषबाधा झाल्याचीही प्रकरणे उघडकीस आली आहे. त्या पार्श्वभूमीवर एकाच वेळी अनेक नागरिक अन्नपदार्थांचे सेवन करतात, अशा ठिकाणी स्वच्छता आणि दर्जाची काटेकोर काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्न तयार होणाऱ्या व वाढल्या जाणाऱ्या ठिकाणची स्वच्छता, अन्नपदार्थांसाठी वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाचा दर्जा, विशेषत: पुन्हापुन्हा होणारा त्याच तेलाचा वापर यावर कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने असे नियम आवश्यक आहेत. मात्र, खऱ्या अडचणी आहेत त्यांच्या अंमलबजावणीत. असे बहुतेक कार्यक्रम धार्मिक उद्देशांनी आयोजित होतात. त्यामध्ये तपासणी-कारवाईचा प्रसंग आणि त्यातून कार्यक्रमात विघ्न आले, तर संवेदनशील प्रसंग उद्भवून तणाव निर्माण होण्याची भीती आहे. अशा कार्यक्रमांसाठी सात दिवसांच्या पूर्वपरवानगीची अटही सर्वसामान्यांसाठी अडचणीची आहे. अशा महाप्रसाद-लंगरसाठी परवानाधारक केटररकडूनच काम करवून घेण्याची अट मात्र जाचक आणि खर्चात वाढ करणारी ठरू शकते. विशेषत: अनेक ठिकाणी असे कार्यक्रम लोकवर्गणीतून आयोजित करण्यात येतात; त्यांपैकी अनेकांना हा खर्च न परवडणारा ठरेल. त्या पलीकडे जाऊन राज्यात खेडोपाडी आणि शहरांमध्ये दररोज हजारो ठिकाणी होणाऱ्या या कार्यक्रमस्थळी जाऊन तपासणी कशी करणार, हा यक्षप्रश्न आहे. आधीच या खात्यात रिक्त पदांची संख्या प्रचंड आहे. त्यातच मुंढे हे आयुक्त झाल्यापासून या खात्यातील कर्मचाऱ्यांना स्वस्थपणे खुर्चीवर बसण्यासाठीही वेळ मिळालेला नाही! त्यांच्या धडाक्यामुळे अनेक हॉटेलांमध्ये शुद्ध पाणी मिळू लागले; ‘ॲनॉलॉग’ पनीरचे प्रमाण कमी झाले आणि दुधातील भेसळसुद्धा उघडकीस आली. नव्याने आखलेली ही कारवाई हा त्याचाच एक भाग म्हणावा लागेल. एकीकडे प्रशासकीय शिस्तीचे पालन आणि दुसरीकडे समाजभावना यांच्यात संघर्ष उद्भवणार नाही सर्वसामान्यांना नियमांचा जाच होणार नाही, याची काळजी मात्र घ्यावी लागेल.

# महापुरात सर्वस्व गमावलेल्या फोटोग्राफरला बांधवांची आपुलकीची साथ

## ‘एआयपीएचएच ऑल इंडिया फोटोग्राफर हेल्पिंग हँड’चा ३० हजारांचा मदतीचा हात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : गेल्या ३१ जुलै रोजी शहरात आलेल्या महापुराचा फटका विविध व्यावसायिकांना बसला. गलवाडे रोडवरील मुंदडा रेसिडेन्सीच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील फोटोग्राफर प्रेम पाटील यांच्या स्टुडिओमध्ये पाणी शिरल्याने उपकरणांसह मोठे नुकसान झाले. नुकसानीचे फोटो आणि व्हिडिओ त्यांनी सोशल मीडियावर प्रसारित केल्यानंतर फोटोग्राफर बांधवांनी मदतीसाठी पुढाकार घेतला.

ऑल इंडिया फोटोग्राफर हेल्पिंग हँड फाऊंडेशन’चे महाराष्ट्र सचिव पवन बन्सल यांनी हा व्हिडिओ पाहिल्यानंतर प्रेम पाटील यांच्याशी संपर्क साधून नुकसानीची माहिती घेतली. प्रेम पाटील हे संघटनेचे सदस्य नसतानाही केवळ फोटोग्राफर बांधव असल्याच्या भावनेतून संस्थेने मदतीचा हात पुढे केला.

संस्थापक व अध्यक्ष धरम सरोज, उपाध्यक्ष अशोक कोटियन, महाराष्ट्र खजिनदार नितीन पाटील, महाराष्ट्र सचिव पवन बन्सल आणि दिलीप सोनार यांनी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी अमळनेर येथे प्रत्यक्ष भेट देत प्रेम पाटील यांना ३० हजार रुपयांचा मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

**संकटात एकजूट महत्त्वाची**

यावेळी संस्थापक अध्यक्ष धरम सरोज यांनी फोटोग्राफर बांधवांना मार्गदर्शन केले. स्टुडिओमध्ये महत्त्वाची उपकरणे तसेच ग्राहकांचा डेटा असतो. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात उपकरणे आणि डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

फोटोग्राफी व्यवसायात स्पर्धेपेक्षा परस्पर सहकार्याची भावना महत्त्वाची आहे. सहकाऱ्याला प्रतिस्पर्धी न मानता मित्र समजून त्याच्या अडचणीच्या काळात मदतीला धावून गेल्यासच व्यवसायाची प्रगती होईल. ‘संकटात मदत हीच खरी एकजूट’ असल्याचे सरोज यांनी सांगितले.

अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र पाटील यांनी असोसिएशनच्या माध्यमातून फोटोग्राफर बांधवांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अडचणीच्या काळात फोटोग्राफर बांधवांना परस्पर सहकार्य करण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष भगवान पाटील, खजिनदार मनोज चित्ते, अनंत पाटील, नितीन भावसार, गौरव शुक्ल, वरुण पाटील, प्रणव महाजन, राहुल भोई, विपुल पाटील, कुणाल पाटील यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य तसेच तालुक्यातील मोठ्या संख्येने फोटोग्राफर बांधव उपस्थित होते. महापुरात नुकसान झालेल्या सहकाऱ्याच्या मदतीला धावून जात फोटोग्राफर बांधवांनी ‘आपत्तीच्या काळात संघटितपणे उभे राहणे’ हाच खऱ्या अर्थाने एकजुटीचा संदेश असल्याचे दाखवून दिले.




*अमळनेर : येथील गलवाडे रोडवरील मुंदडा रेसिडेन्सीच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील फोटोग्राफर प्रेम पाटील यांच्या स्टुडिओमध्ये पाणी शिरल्याने उपकरणांसह मोठे नुकसान झाले. त्यामुळे त्यांच्याकडे आपुलकीची साथ म्हणून ३० हजार रुपये मदतीचा धनादेश सुपूर्द करताना ‘एआयपीएचएच ऑल इंडिया फोटोग्राफर हेल्पिंग हँड’चे संस्थापक अध्यक्ष भगवान पाटील, खजिनदार मनोज चित्ते, अनंत पाटील, नितीन भावसार, गौरव शुक्ल, वरुण पाटील, प्रणव महाजन, राहुल भोई, विपुल पाटील, कुणाल पाटील यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य तसेच तालुक्यातील फोटोग्राफर बांधव.*



*अमळनेर : भारतीय जनता पार्टीचे जळगाव जिल्हाध्यक्ष (पश्चिम) डॉ. राधेश्याम चौधरी यांना वाढदिवसानिमित्त गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी त्यांच्या जळगावातील निवासस्थानी पुष्पगुच्छ देत शुभेच्छा देताना मंगळग्रह सेवा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. आर. जी. चव्हाण, दै. ‘ग्लोबल महातेज’चे मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, निवृत्त महसूल कर्मचारी अरुण चौधरी व श्री मंगळग्रह मंदिराचे सेवेकरी जितेंद्र साळुंखे.*

# गतिरोधक बसविले; दिशादर्शक फलक, पांढरे पट्टे गायबच!

## चोपडा-अमळनेर-धुळे मार्गावर अपघाताचा धोका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरातून जाणाऱ्या चोपडा-अमळनेर-धुळे या प्रमुख मार्गावर अरिहंत मेडिकलजवळ, प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या शासकीय निवासस्थानासमोर नुकतेच गतिरोधक बसविण्यात आले. ही अतिशय सकारात्मक बाब आहे. जेणेकरून वाहनचालकांना वाहनाच्या वेगाला लगाम घालता येईल. मात्र, त्या गतिरोधकांवर ठळक पांढरे पट्टे, रिफ्लेक्टर तसेच वाहनचालकांना पूर्वसूचना देणारे दिशादर्शक फलक लावलेले नसल्याने हे गतिरोधक रात्री धोकादायक ठरत आहेत. अचानक समोरून येणाऱ्या वाहनचालकांमध्ये गतिरोधकामुळे संभ्रम निर्माण होत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे.

शहरातील हा प्रमुख मार्ग असल्याने या रस्त्यावर दिवसभर दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्त्याच्या दुतर्फा अनेक रहिवासी कॉलन्या आहेत. काही अंतरावरच शाळा व महाविद्यालयेही आहेत. विशेष म्हणजे आमदारांचे निवासस्थान व कार्यालयही याच मार्गालगत काही अंतरावर असल्याने या रस्त्यावर नागरिकांची आणि वाहनांची सतत ये-जा सुरू असते.

गतिरोधक अचानक समोर आल्याने वाहनचालकांना वेळीच वेग कमी करता येत नाही. विशेषतः रात्री प्रकाशाच्या अभावामुळे गतिरोधक स्पष्टपणे दिसत नसल्याने दुचाकीस्वारांचा तोल जाणे, वाहनांचे नियंत्रण सुटणे किंवा अपघात होण्याची शक्यता आहे. गतिरोधक बसविल्यानंतर त्याच्या दोन्ही बाजूंना ‘पुढे गतिरोधक’ असे स्पष्ट दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर आणि ठळक पांढरे पट्टे असणे आवश्यक असताना संबंधित यंत्रणेने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गतिरोधक सुरक्षेसाठी की अपघाताला निमंत्रण देण्यासाठी? असा सवाल वाहनधारकांकडून उपस्थित केला जात आहे.


दरम्यान, संबंधित विभागाने तातडीने गतिरोधकावर पांढरे पट्टे मारावेत, रिफ्लेक्टर बसवावेत तसेच दोन्ही बाजूंना स्पष्ट दिशादर्शक फलक लावावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे. अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्याआधीच सुरक्षेच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



*अमळनेर : शहरातून जाणाऱ्या चोपडा-अमळनेर-धुळे या प्रमुख मार्गावर अरिहंत मेडिकलजवळ, प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांच्या शासकीय निवासस्थानासमोर नुकतेच बसविण्यात आलेले मात्र दिशादर्शक फलक लावलेले नसल्याने अपघातास निमंत्रण ठरू पाहणारे गतिरोधक.*

# डॉ. रूपेश सैंदाणे यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : डॉ. रूपेश अनिल सैंदाणे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून औषधनिर्माण शास्त्रातील ‘फार्मास्युटिक्स’ विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. ‘फॉर्म्युलेशन डेव्हलपमेंट अँड डिझाईन ऑफ को-क्रिस्टल ड्रग डिलिव्हरी सिस्टिम’ या विषयावर त्यांनी संशोधन केले. या संशोधनातून कंबरदुखीवर जलद परिणाम करणारी तसेच दीर्घकाळ प्रभाव टिकवून ठेवणारी औषध वितरण प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

संशोधन कालावधीत डॉ. सैंदाणे यांनी चार आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रसिद्ध केले असून, तीन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर केले आहे. नाशिक येथील भुजबळ नॉलेज सिटीच्या एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. या संशोधनासाठी त्यांना डॉ. नीलिमा ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सैंदाणे यांनी बी. फार्मसी अभ्यासक्रमासाठी ‘इंडस्ट्रियल फार्मसी-२’ हे पुस्तकही प्रकाशित केले आहे. तसेच मार्च २०२६ मध्ये अमेरिकेतील क्वांटिक स्कूल ऑफ बिझनेस अँड टेक्नॉलॉजी येथून १०० टक्के शिष्यवृत्ती मिळवत त्यांनी ‘एक्झिक्युटिव्ह एमबीए’ची पदवीही पूर्ण केली आहे.

सध्या ते मुंबई येथील फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनी ‘सर्व्हियर लॅबोरेटरीज’ येथे ‘ड्रग प्रॉडक्ट लीड’ या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या शैक्षणिक व व्यावसायिक यशाबद्दल शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे. डॉ. रूपेश सैंदाणे हे मूळचे मुकटी (ता. जि. धुळे) येथील आहेत. सध्या अमळनेर येथे स्थायिक असलेले डॉ. अनिल विनायक सैंदाणे व सौ. नलिनीताई सैंदाणे यांचे ते सुपुत्र आहेत. मुकटी येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील विनायक पाटील व रवींद्र विनायक पाटील यांचे ते पुतणे आहेत. डॉ. रूपेश सैंदाणे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तेरापंथ युवक परिषदेतर्फे १७ सप्टेंबरला अमळनेरमध्ये भव्य रक्तदान शिबिर

## रक्तदात्याला मिळणार प्रोत्साहनपर ट्रॉली बॅग भेट

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद प्रस्तुत व आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या प्रेरणेने गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ‘रक्तदान… जीवनदान… आपका एक कदम, किसी के लिए नई उम्मीद…’ आणि ‘थेंब तुमचा जीवन त्यांचे - रक्तदान ही सर्वोत्तम सेवा… मानवतेचा खरा उत्सव’ या संदेशासह हे शिबिर होणार



आहे. न्यू प्लॉटमधील तेरापंथ भवनात व प्रताप महाविद्यालयात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिर होणार आहे.

विशेष म्हणजे शिबिरात रक्तदान करणाऱ्यास प्रोत्साहनपर भेट म्हणून आकर्षक ट्रॉली बॅग भेट देण्यात येणार आहे. ‘रक्तदान करा… आयुष्य भेट घ्या… एक छोटी कृती मोठा फरक!’ हा यामागचा उद्देश असून सुरक्षित रक्तदान, निरोगी समाज, उज्ज्वल भविष्य आणि नवीन जीवन हा संदेश देण्यात आला आहे. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन तेरापंथ युवक परिषद व शिबिराचे सहयोगी असलेले अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघ, रोटरी क्लब, रोट्रॅक्ट क्लब, लायन्स क्लब आणि जैन सोशल ग्रुप आदींनी केले आहे.

# खासदार स्मितताई वाघ यांना सलग दुसऱ्यांदा ‘संसदरत्न’

पान १ वरून

यावेळी खासदार श्रीमती वाघ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे मार्गदर्शन व विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच संसद रत्न पुरस्कार समिती, ज्युरी सदस्य, संसदीय सहकारी, भाजप परिवारातील पदाधिकारी व कार्यकर्ते, सहकारी आणि शुभेच्छुकांचेही त्यांनी आभार मानले.

दरम्यान, खासदार श्रीमती वाघ यांना सलग दुसऱ्यांदा प्राप्त झाल्याने जळगाव जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# १० वीं-१२ वीं में फेल, असफलता ने उन्हें भीतर से हिलाया

## फिर पहले ही प्रयास में बनी अंजू शर्मा 'आयएएस'

सक्सेस स्टोरी





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवन में मिलने वाली असफलताएं कभी भी आपके भविष्य का फैसला नहीं कर सकती हैं। यदि आपके अंदर अपनी गलतियों से सीखने और आगे बढ़ने का जज्बा है, तो आप दुनिया का सबसे बड़ा मुकाम भी हासिल कर सकते हैं। इस बात की मिसाल हैं आईएएस अधिकारी अंजू शर्मा, जो स्कूल के दिनों में १० वीं और १२ वीं की परीक्षाओं में फेल हो गई थीं, लेकिन आगे चलकर उन्होंने देश की सबसे कठिन मानी जाने वाली यूपीएससी सिविल सेवा परीक्षा को पहले ही प्रयास में क्रैक कर दिखाया। अंजू शर्मा की यह कहानी उन लाखों छात्रों के लिए एक जबरदस्त प्रेरणा है, जो कम नंबर आने या असफल होने पर हताश हो जाते हैं।

**१० वीं और १२ वीं की परीक्षाओं में हुई थी फेल**

अंजू शर्मा का शुरुआती स्कूली सफर काफी उतार-चढ़ाव भरा रहा। वे १०वीं कक्षा की प्री-बोर्ड परीक्षा के दौरान केमिस्ट्री विषय में फेल हो गई थीं। इसके बाद १२वीं कक्षा में भी उन्हें बड़ा झटका लगा, जब वे इकोनॉमिक्स के पेपर में फेल हो गईं। लगातार दो महत्वपूर्ण पड़ावों पर मिली असफलता ने उन्हें भीतर से हिला दिया। लेकिन उन्होंने हार मानने या निराश होने के बजाय इस बात के बारे में गहराई से सोचा कि आखिर उनसे गलती कहां हुई।

**असफलता से ली सबसे बड़ी सीख**

अपनी नाकामयाबी पर विचार करते हुए अंजू को समझ आया कि उनकी सबसे बड़ी गलती परीक्षा से ठीक पहले पढ़ाई शुरू करना थी। जब कोई छात्र आखिरी समय में पढ़ाई करता है, तो घबराहट और तनाव के कारण प्रदर्शन खराब हो जाता है। उन्होंने तय किया कि वे अब कभी भी अंतिम समय की पढ़ाई पर निर्भर नहीं रहेंगी। उन्होंने अपनी रणनीति पूरी तरह बदल दी और सिलेबस को परीक्षा से महीनों पहले ही एडवांस में पूरा करने का नियम बनाया।

**२२ साल की उम्र में पहले ही प्रयास में बनीं आयएएस**

अपनी नई रणनीति, कड़े अनुशासन और निरंतर अध्ययन के बल पर उन्होंने अपनी कॉलेज की पढ़ाई शानदार अंकों के साथ पूरी की। इसके बाद उन्होंने मात्र २२ साल की उम्र में यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में भाग लिया। अंजू शर्मा ने प्रीलिम्स, मेन्स और इंटरव्यू तीनों चरणों को एक ही बार में पार करते हुए पहले ही प्रयास में सफलता हासिल की और भारतीय प्रशासनिक सेवा (आयएएस) में शामिल हुईं।

**छात्रों के लिए सफलता का मूलमंत्र**

अंजू शर्मा की यह प्रेरणादायक कहानी सिखाती है कि परीक्षा में असफल होना आपके जीवन का अंत नहीं है। अपनी गलतियों और कमजोरियों को स्वीकार कर सही समय पर रणनीति बदलना ही असली समझदारी है। निरंतरता ही किसी भी कठिन परीक्षा को पास करने की सबसे बड़ी कुंजी है।

# 'लबाड' लांडग्यामध्येही असतात 'हे' १० चांगले गुण

## आयुष्यात यशस्वी होण्यास पडतील उपयोगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लांडग्याची 'लबाड' ही प्रतिमा आजपर्यंत आपल्या मनात बिंबवण्यात आली आहे, पण लांडगा खरंच लबाड असतो का? त्याचे चांगले गुण अंगीकारले तर तुमचेही आयुष्य बदलून जाईल.

**उत्तम गुण :** चला तर मग लांडग्याकडून कोणते १० उत्तम गुण शिकल्यास आपल्या आयुष्याला कलाटणी मिळू शकते ते जाणून घेऊया

**निष्ठा आणि संघकार्य :** लांडगे त्यांच्या कळपाशी अत्यंत एकनिष्ठ असतात. ते सर्वोत्तम सांघिक खेळाडू आहेत. सहा ते दहाच्या कळपात राहून शिकार करतात. आपले स्थान ओळखा, नियमांचे पालन करा आणि गटाशी एकनिष्ठ राहा.

**खडतर वातावरणात तग :** लांडगे जगातील सर्वात प्रतिकूल वातावरणातही तग धरतात आणि भरभराट करतात. उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर वापर करून परिस्थिती स्वीकारतात.



**वडीलधाऱ्यांप्रति आदर :** कळपातील श्रेणीबद्ध रचनेमुळे तरुण लांडगे वडीलधाऱ्यांबद्दल खूप आदर बाळगतात. त्यांची भूमिका स्पष्ट असते.

**फक्त गरजेपुरतेच घ्या :** लांडगे फक्त आवश्यक तेवढेच घेतात. प्रत्येक कृतीमागे ठोस कारण असते. माणूस गरजेपेक्षा जास्त घेतो आणि ग्रह नष्ट करतो. अनावश्यक खरेदी थांबवा.

**एकटे लांडगे :** काही लांडगे कळपातून बाहेर काढले जातात, पण ते निरुपयोगी नसतात. ते स्वतःची काळजी घेण्यास सक्षम असतात. 'एकटा लांडगा' म्हणजे स्वतःहून गोष्टी करायला आवडणारी व्यक्ती. तुम्ही जसे आहात, त्याचा अभिमान बाळगा.

**प्रभावी संवाद :** लांडगे ओरडणे, गुरगुरणे, नजर आणि देहबोलीने संपूर्ण कळपाला दिशा देतात. गंध आणि स्पर्शानेही संवाद साधतात. त्यामुळेच ते यशस्वी शिकारी बनतात.

**स्नेह व्यक्त करा :** लांडगे एकमेकांना चाटून, कुरवाळून आणि स्पर्शान प्रेम व्यक्त करतात. व्यस्त जीवनात जोडीदारासोबत वेळ काढा आणि प्रेम दाखवण्यास विसरू नका.

**संधी मिळेल तेव्हा आंनद घ्या :** काही काम नसताना लांडगे खेळतात आणि मजा करतात. मोकळ्या वेळेत आवडते काम करा. स्वतःची काळजी घेणे फायदेशीर आहे.

**विश्रांती :** लांडगे ऊर्जा वाचवतात जेणेकरून शिकारीच्या वेळी ताकद राहील. पुरेशी विश्रांती घ्या. स्वतःला खूप थकवू नका.

**तुमचा ठसा उमटवा :** लांडगे आपला ठसा सोडतात. माणसांनीही आयुष्यात अर्थपूर्ण छाप सोडावी. तुम्हाला फक्त एक संधी मिळते - आवडते काम करा आणि जगात आपली ओळख निर्माण करा.

# पाच हजारांची वस्तू पंधराशे रुपयांना?

## डिस्काउंट सेलमध्ये कंपन्या कसा कमावतात नफा? 'हे' गुपित ऐकून थक्क व्हाल!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




सेल लागल्यावर ५,००० रुपयांची वस्तू अवघ्या १,५०० रुपयांत कशी मिळते? अर्ध्यापेक्षा कमी किमतीत वस्तू विकूनही कपन्यांना मोठा नफा कसा मिळतो? मध्यमवर्गीयांना सर्वाधिक आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे सेल. भांड्याच्या दुकानापासून काचेच्या मॉल्सपर्यंत जिथे कुठे सेल असतो, तिथे हमखास गर्दी पाहायला मिळते. अशा ऑफर्समध्ये खरेदी करताना तुमच्या मनात एक प्रश्न हमखास आला असेल. दुकानदारांना सेलमध्ये अर्ध्या किमतीत वस्तू विक्री करून काय परवडत असेल? की महागडे लेबल लावून स्वस्त विकण्याची ट्रीक असेल? कंपन्या मोठ्या सवलतीत (उदा. ५,००० रुपयांची वस्तू १,५०० रुपयात) वस्तू विकूनही मोठा नफा मिळवतात. यामागे काही प्रमुख बिसनेस स्ट्रॅटेजी आहे.

**उत्पादन खर्च खूप कमी असणे**

कपडे, इलेक्ट्रॉनिक्स किंवा ॲक्सेसरीज यांसारख्या वस्तूंचा खरा उत्पादन खर्च खूपच कमी असतो. ५,००० रुपये ही केवळ त्या वस्तूची छापील किंमत (एमआरपी) असते. ज्यावर कंपनीने आधीच फुगवून मार्जिन ठेवते. सेलमध्ये ती वस्तू १,५०० रुपयांना विकली तरी तिचा मूळ खर्च ५०० ते ८०० रुपयांच्या आतच असतो. त्यामुळे अर्ध्या किमतीत विकूनही कपनी नफ्यातच असते. यामध्ये झुडीओ, पँटालून्ससारखे ब्रँड तर स्वतः उत्पादन तयार करत असल्याने आणखी खर्च वाचतो.

**मोठ्या प्रमाणावर विक्री**

कंपन्यांनी भारतीय ग्राहकांची नस ओळखली आहे. सेलमध्ये महागडी वस्तू स्वस्तात मिळतेय म्हणून अनेक ग्राहक गरज नसतानाही खरेदी करतो. या मानसिकतेचा फायदा कंपन्यांना होतो. सेलच्या काळात लाखो ग्राहक खरेदी करतात. जेव्हा विक्रीचे प्रमाण खूप मोठे असते, तेव्हा प्रति वस्तू मिळणारा नफा कमी असला तरी एकूण मिळणारा नफा खूप मोठा असतो.

**क्लिअरन्स सेल आणि डेड स्टॉक**

ट्रेंडसोबत चालण्यासाठी कंपन्यांना सतत नवीन स्टॉक भरावा लागत असतो. अशावेळी जुना माल गोदामात पडून राहिला तर त्याचा मेंटेनन्स, भाडे आणि वस्तू खराब होण्याचा खर्च वाढतो. अशा वेळी वस्तू पडून राहून पूर्ण नुकसान होण्यापेक्षा, ती उत्पादन खर्चाच्या आसपास किंवा थोड्या नफ्यात विकून गुंतलेला पैसा मोकळा करणे कंपन्यांसाठी फायदेशीर ठरते.

**क्रॉस-सेलिंग आणि अप-सेलिंग**

सेलमध्ये स्वस्त वस्तू पाहून ग्राहक दुकानात किंवा वेबसाइटवर येतात. १५०० रुपयांची वस्तू खरेदी करताना ग्राहक इतर पूर्ण किंमत असलेल्या वस्तू किंवा ॲक्सेसरीज (उदा.- फोनसोबत महागडे कव्हर किंवा टेम्पर्ड ग्लास) खरेदी करतात. ज्यामुळे कंपनीचा एकूण नफा वाढतो.

**मार्केटिंग स्ट्रॅटेजी**

सेल हा जाहिरातीचाच एक भाग असतो. ५,००० ची वस्तू १,५०० ला देऊन कंपनी नवीन ग्राहकांना आकर्षित करते. एकदा ग्राहक जोडला गेला की तो भविष्यातही त्या ब्रँडकडून खरेदी करत राहतो, ज्यामुळे कंपनीचा दीर्घकालीन फायदा होतो. नवीन ग्राहक जोडण्यासाठी कंपन्या वर्षभर अशा जाहिराती करत असते. यातून पुढे तुमचा मोबाईल नंबर मिळाला की त्याद्वारे तुम्हाला सेलची माहिती दिली जाते.

# चिकू खाण्याचे 'हे' फायदे माहीत आहेत का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चिकू हे चविष्ट आणि पौष्टिक फळ असून त्यामध्ये नैसर्गिक साखर, आहारातील फायबर, जीवनसत्त्वे आणि विविध खनिजे आढळतात. चिकूमध्ये असलेले फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करू शकते. फळे हा संतुलित आणि पौष्टिक आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाने आपल्या आहारात विविध प्रकारच्या फळांचा समावेश करणे फायदेशीर ठरते. फळांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर, पाणी आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे शरीराला आवश्यक पोषक घटक मिळण्यास मदत होते. नियमितपणे फळं खाल्ल्याने पचनक्रिया सुरळीत राहण्यास, शरीराला हायड्रेटेड ठेवण्यास आणि एकूण आरोग्य चांगले राखण्यास मदत होऊ शकते.



चिकू नैसर्गिक गोडवा आणि ऊर्जा देणारे फळ असल्याने थकवा जाणवत असताना ते आहाराचा भाग म्हणून घेता येते. मात्र, त्यात नैसर्गिक साखरेचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याने मधुमेह असलेल्या व्यक्तींनी चिकूचे सेवन प्रमाणात करणे योग्य ठरते.

**चिकू खाण्याचे फायदे**

**पचनक्रिया सुधारण्यास मदत :** चिकूमध्ये आहारातील फायबर असते. त्यामुळे आतड्यांची हालचाल सुरळीत राहण्यास आणि बद्धकोष्ठतेची समस्या कमी करण्यास मदत होऊ शकते.

**शरीराला ऊर्जा मिळते :** चिकूमध्ये नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट्स असल्यामुळे ते शरीराला पटकन ऊर्जा देऊ शकते. त्यामुळे थकवा जाणवत असताना चिकू एक चांगला फळांचा पर्याय ठरू शकतो.

**हाडांच्या आरोग्यासाठी उपयुक्त :** चिकूमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम यांसारखी खनिजे काही प्रमाणात असतात, जी हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची आहेत.

**रोगप्रतिकारक शक्तीला आधार :** चिकूमध्ये जीवनसत्त्व सी आणि अँटीऑक्सिडंट घटक आढळतात. हे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास आणि प्रतिकारशक्तीच्या सामान्य कार्याला मदत करू शकतात.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर :** चिकूमधील पोटॅशियम आणि फायबर संतुलित आहाराचा भाग म्हणून हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**त्वचेसाठी उपयुक्त :** चिकूमधील अँटीऑक्सिडंट्स आणि विविध जीवनसत्त्वे त्वचेच्या आरोग्यासाठी आधार देऊ शकतात.

# छातीतील कफ, खोकला आणि सर्दीचा 'द एंड'!

## 'मसाल्यांची राणी'चा वापर करणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कफ, खोकला आणि सर्दीवर उपचार करण्यात हा मसाला अत्यंत प्रभावी सिद्ध होतो. बदलत्या हवामानात काळ्या मिरीचे सेवन आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरू शकते. अचानक तीव्र दडपण, वेदना जाणवणे आणि सर्दी-पडसे दीर्घकाळ टिकून राहते. अशा वेळी भारतीय स्वयंपाकघरात उपस्थित असलेल्या आणि 'मसाल्यांची राणी' मानल्या जाणाऱ्या काळ्या मिरीचा वापर आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो. आयुर्वेदात काळ्या मिरीला तिच्या तिखट चव आणि उष्ण गुणधर्मामुळे (तासीर) कफ आणि वात संतुलित करणारी मानले गेले आहे.

एका वृत्तानुसार युनानी डॉक्टर हकीम सुलेमान खान यांनी सांगितले, की काळी मिरी हा असा मसाला आहे जो भारतासोबतच इतर देशांमध्येही खूप लोकप्रिय आहे. इंग्रजही या भारतीय मसाल्याचे चाहते राहिले आहेत. याची लोकप्रियता केवळ याच्या तिखट चवीमुळे नाही, तर याच्या पारंपारिक आरोग्यदायी फायद्यांमुळेही आहे. हा मसाला जेवणाची चव वाढविण्यासोबतच शरीराला अनेक प्रकारे फायदा पोहोचवू शकतो. कफ, खोकला आणि सर्दीवर उपचार करण्यात हा मसाला अत्यंत प्रभावी सिद्ध होतो. अनेकदा लोक काळ्या मिरीची पावडर बनवून जेवणावर शिंपडून तिचा वापर करतात. चला तज्ज्ञांकडून जाणून घेऊया की बदलत्या हवामानात काळ्या मिरीचे सेवन आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरू शकते.

**काळ्या मिरीतील पोषक तत्त्वे**

आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या मते काळ्या मिरीमध्ये 'पायपेरिन' नावाचे एक मुख्य ॲक्टिव्ह कंपाऊंड आढळते. पायपेरिनमध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि सूज कमी करण्यात भूमिका बजावू शकतात. याशिवाय, पायपेरिन शरीरात इतर काही पोषक तत्वे आणि कंपाऊंड्सचे शोषण सुधारण्यासाठी देखील ओळखले जाते. म्हणूनच काळ्या मिरीला पारंपारिकपणे आरोग्यासाठी उपयुक्त मसाला मानले जाते. हकीम सुलेमान यांच्या मते, काळ्या मिरीचे सेवन योग्य प्रमाणात आणि योग्य कॉम्बिनेशनसोबत केले तर ते मोसमी संसर्गापासून बचाव करण्यात अद्भुत असर दाखवते.

**काळी मिरी का मानली जाते फायदेशीर?**

काळी मिरी केवळ जेवणाची चव वाढवणारा मसाला नाही, तर ती अनेक फायद्यांसाठीही



ओळखली जाते. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने सेवन केल्यास ती पचन आणि हवामानातील बदलादरम्यान होणाऱ्या त्रासांपासून आराम मिळवून देण्यात मदत करू शकते. हकीम सुलेमान यांनी सांगितले, की हा एक असा मसाला आहे ज्याचा गुणधर्म उष्ण आहे. आहे. हा मसाला कफावर उत्तम उपाय आहे. बदलत्या हवामानात याचा काढा किंवा गरम पेयांमध्ये समावेश केला जातो. काळ्या मिरीचे सेवन सर्दी-खोकला, कफ आणि पडशासारख्या हंगामी त्रासांपासून आराम देण्यास मदत करू शकते असे मानले जाते. याचे सेवन पचनापासून ते शरीराशी जोडलेल्या इतरही अनेक समस्यांवर प्रभावी ठरते. हवामान बदलादरम्यान खाण्यापिण्याच्या आणि दिनचर्येतील बदलांमुळे अनेक लोकांना अपचन, गॅस, पोट फुगणे किंवा बद्धकोष्ठतेसारख्या पचनाच्या समस्या होऊ शकतात. अशा वेळी याचे संतुलित प्रमाणात केलेले सेवन पचनसंस्थेला सपोर्ट करू शकते.

**पचनसंस्था सुधारण्यास कशी मदत करते?**

हा मसाला पचनसंस्था उत्तम ठेवण्यास मदत करू शकतो. यामध्ये असलेले फायबर आणि इतर नैसर्गिक पोषक तत्वे आतड्यांची हालचाल सुधारण्यास, मलविसर्जन सोपे करण्यास आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्येपासून बचाव करण्यास मदत करू शकतात. पुरेशा प्रमाणात पाण्यासोबत याचे सेवन केल्यास पचनक्रियेला आणखी चांगला पाठिंबा मिळू शकतो.

**हंगामी आजारांपासून करते बचाव**

हवामान बदलल्यावर सर्दी-जुकाम, घशात खवखव आणि व्हायरल संसर्गासारख्या समस्यांचा धोका वाढू शकतो. यामध्ये असलेले व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स शरीराच्या इम्युनिटीला सपोर्ट करण्यास मदत करू शकतात. नियमितपणे संतुलित आहाराचा भाग बनवून याचे सेवन केल्यास ते शरीराला संसर्गाशी लढण्यासाठी आवश्यक पोषक तत्वे पुरवू शकते. तथापि, याला कोणत्याही मोसमी आजारावरील उपचार किंवा त्यापासून संपूर्ण बचावाची हमी मानू नये.

**डोळ्यांची दृष्टी वाढवण्यात मदतगार**

यामध्ये असलेली काही पोषक तत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स डोळ्यांच्या आरोग्याला सपोर्ट करू शकतात. हे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसमुळे होणाऱ्या नुकसानीपासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. डोळे निरोगी ठेवण्यासाठी मर्यादित प्रमाणात या मसाल्याचे सेवन प्रभावी सिद्ध होते.

**मेंदू तीक्ष्ण करण्यास कशी फायदेशीर**

यामध्ये असलेली पोषक तत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स मेंदूच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसपासून वाचवण्यात आणि सामान्य ब्रेन फंक्शनला सपोर्ट करण्यात भूमिका बजावू शकतात. संतुलित आहाराचा भाग म्हणून याचे सेवन स्मरणशक्ती आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते.पचन सुधारण्यास फायदेशीर  काळ्या मिरीमध्ये असलेले फायबर आणि इतर बायोॲक्टिव्ह कंपाऊंड्स पचनसंस्थेला सपोर्ट करू शकतात. पुरेशा प्रमाणात सेवन केल्यास हे आतड्यांची सामान्य हालचाल टिकवून ठेवण्यास, मलविसर्जन सुधारण्यास आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्येपासून बचाव करण्यास मदत करू शकते. आयुर्वेदानुसार काळ्या मिरीचे किती सेवन पुरेसे आहे आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या मते निरोगी व्यक्ती अन्नामध्ये रोज सुमारे १-२ ग्राम म्हणजेच जवळपास -१ चमचा काळ्या मिरीची पावडर खाऊ शकते. तथापि, हे प्रमाण व्यक्तीची प्रकृती आणि आरोग्याच्या स्थितीनुसार बदलू शकते. जास्त प्रमाणात काळी मिरी घेतल्यास काही लोकांमध्ये ॲसिडिटी, छातीत जळजळ किंवा पोटाचा त्रास होऊ शकतो.




# श्रावणातील शुक्रवारी का केले जाते कुंकुमार्चन ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावणातील कुठल्याही शुक्रवारी किंवा तुमच्या कुलस्वामिनीचा जो कुठला वार असेल त्या दिवशी देवीला कुंकुमार्चन करावे.

**शरणागत दीनार्त परित्राण परायणे। सर्वस्यार्तिहरे देवि नारायणी नमोऽस्तु ते ॥**

**कुंकुमार्चन विधीचे साहित्य :**

२ ताम्हन, हळद-कुंकू, विडा, सुपारी, ५ फळे, कापसाचे वस्त्र, पूजेस बसावयास आसन, अत्तर, सर्व प्रकारची सुवासिक फुले, देवीस गजरा, वेणी, निरंजन, समई, सुटते पैसे, धूप-दीप नेवैद्यास साखर घातलेले गोड दुध, पेढे, घरी केलेला गोड पदार्थ आणि दुपारी महानैवेद्य. दिवसभर समई लावून ठेवावी.

**कुंकुमार्चन पूजा विधी :** पूजेस बसण्यापूर्वी घरातील मोठ्या मंडळींना नमस्कार करावा. धूतवस्त्र वेसावे. पुरुष पूजेस बसणार असतील तर जानवे घालावे. देवीची देव्हाऱ्यातील मूर्ती एका ताम्हनात घेऊन चौरंगावर किंवा पाटावर ठेवावी. तिला शुद्धोधकाने अर्थात स्वच्छ पाण्याने मग सुवासिक पाण्याने, दुधाने अंघोळ घालून, पुसून हळद-कुंकू लावावे. फुलाने अत्तर लावावे, मग कुंकुमार्चनास सुरवात करावी.

**कुंकुमार्चन म्हणजे काय ?**

तर देवीच्या मूर्तीवर कुंकवाने केलेला अभिषेक. काही ठिकाणी देवीच्या फक्त पायावर कुंकुमार्चन करण्याची प्रथा आहे. हा अभिषेक करत असताना देवीच्या जपाचा मंत्रजागर होणे आवश्यक आहे. 'देवीचा जप करत एक-एक चिमूटभर कुंकू देवीच्या चरणांपासून प्रारंभ करून तिच्या मस्तकापर्यंत वहावे अथवा देवीचा नामाचे उच्चारण करत तिला कुंकवाने स्नान घालावे.

**कुंकवाने अभिषेक का करतात ?**

मूळ कार्यरत शक्तींतत्त्वाची निर्मिती ही लाल रंगाच्या प्रकाशातून झालेली असल्याने शक्तीतत्त्वाचे दर्शक म्हणून

**जाणून घ्या कारण आणि विधी**



देवीची पूजा कुंकवाने करतात. कुंकवातून प्रक्षेपित होणाऱ्या गंधलहरींच्या सुवासाकडे ब्रह्मांडातील शक्तीज तत्त्वाच्या लहरी अल्प कालावधीत आकृष्ट होत असल्याने मूर्तीतील सगुण तत्त्वाला जागृत करण्यासाठी लाल रंगाचे दर्शक, तसेच देवीतत्त्वाला प्रसन्न करणाऱ्या गंधलहरींचे प्रतीक म्हणून कुंकवाच्या उपचाराला देवीपूजेत अग्रगण्य स्थान दिले आहे. मूळ शक्तीरतत्त्वाच्या बिजाचा गंध हाही कुंकवातून दरवळणाऱ्या सुवासाशी साधर्म्य दर्शवणारा असल्याने देवीला जागृत करण्यासाठी कुंकवाचे प्रभावी माध्यम वापरले जाते.

कुंकुमार्चन अभिषेक केलेले कुंकू लावून केला गेलेला जप आणि साधना अधिक एकाग्रतेने होते. कुंकुमार्चन घटाच्या ठिकाणी देवीचे रूप आहे, असा भाव ठेवून, घरी देवीच्या मूर्तीवर किंवा देवळात कुठेही करू शकतो. कुंकुमार्चन करण्यासाठी प्रत्यक्ष देवी समोर उभी आहे, असा भाव ठेवा. देवीचा नामजप करत एकाग्रतेने चिमूट-चिमूट कुंकू चरणांपासून मस्तकापर्यंत वहा. ही पूजा स्त्री / पुरुष कुणीही करू शकतात. ह्याला कसलेच बंधन नाही. देवीला लावलेले कुंकू भक्तीभावाने स्वतःला लावा. कुंकुमार्चनाने मूर्ती जागृत होऊन मूर्तीतील शक्तीतत्त्व कुंकवात येते आणि त्याचा आपणास लाभ होतो. आपली श्रद्धा जितकी जास्त तितकी अनुभूती जास्त येते.

बाजारात कुंकू मिळते. दुकानदाराला पूजेचे, अभिषेकाचे कुंकू सांगावे. ते महाग आहे म्हणून साधे वापरू नये. हातावर खूप काळ रंग चिकटून रहाणारे रासायनिक पदार्थांचा अधिक वापर असणारे कुंकू वापरणे टाळा. कधी कधी कुंकू हे फारच लाल चुटुक असते आणि ते छान दिसते म्हणून बायका घेतात पण त्यात रसायने असतात. ते घेऊ नये. रंगावर भुलून जाऊ नये.

कुंकुमार्चन करताना श्रीसूक्ताचा पाठ १५ वेळा करावा. १६ व्या वेळी संपूर्ण श्रीसूक्त म्हणून फलश्रुतीही म्हणावी म्हणजे श्रीसूक्ताचे १ आवर्तन झाले. काही ठिकाणी सामूहिक ही पूजा करतात. चंदनाची उदबत्ती मिळाली तर जरूर लावावी. सर्व पूजा झाल्यावर एका ताटात खण नारळ घेऊन घरातील देवीची ओटी भरावी. डाळिंब मिळाले तर आणावे देवीस ते फार प्रिय आहे. नवरात्रीचे ९ दिवस एका निरांजनात अगदी लहान कापूर घेऊन तो प्रत्येक खोलीत जाळावा. घराला ४ खोल्या असतील तर प्रत्येक खोलीत ते निरंजन घेऊन जावे आणि तेथे एक कापुराची वडी त्यात जाळावी मग ते उचलून दुसऱ्या खोलीत न्यावे आणि पुन्हा तेच करावे. याने घरात अत्यंत सकारात्मक ऊर्जा आणि लहरी निर्माण होतात करून पाहा.



# तुळजाभवानींचे स्मरण !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आई तुळजाभवानींच्या चरणी मनापासून नतमस्तक होऊया. आयुष्यात कितीही संकटे आली, कितीही अडचणी आल्या, मन अस्वस्थ झाले किंवा पुढचा मार्ग दिसेनासा झाला तरी आईंचे नामस्मरण मनाला आधार देते. फक्त डोळे मिटा आणि प्रेमाने म्हणा

**जगदंब जगदंब, आई राजा उदो उदो।**

आईंकडे नेहमी मोठ्या अपेक्षा घेऊनच जावे असे नाही. कधी-कधी काहीही न मागता फक्त त्यांचे नाव घ्यावे. कारण नामस्मरणातून मनातील भीती कमी होते, विचारांना स्थैर्य मिळते आणि संकटाकडे पाहण्याची आपली शक्ती वाढते.

**जगदंब जगदंब । आई राजा उदो उदो ।**
**तुळजाभवानी माता की जय ।**

# कुलदेवी नमस्तुभ्यं, कुलवृद्धी, कल्याण आणि मंगलमय जीवनासाठी प्रार्थना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोकण सनातन परंपरेमध्ये कुलदेवता किंवा कुलदेवी यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक कुटुंबाच्या श्रद्धा, परंपरा आणि आध्यात्मिक वारशाशी कुलदेवीचे नाते जोडलेले असते. आपल्या पूर्वजांनी ज्या देवतेची श्रद्धेने उपासना केली, तिचे स्मरण करणे म्हणजे केवळ धार्मिक विधी करणे नव्हे, तर आपल्या कुलपरंपरेशी, संस्कारांशी आणि आध्यात्मिक मुळांशी जोडले जाणे होय. याच भावनेतून पुढील प्रार्थना केली जाते.

**॥ कुलदेवी नमस्तुभ्यं, कुल-वृद्धि प्रदायिनी।**
**कुल-काम प्रदे देवी, सदा मंगल कारिणी॥**

या श्लोकाची सुरूवात 'कुलदेवी नमस्तुभ्यं' या शब्दांनी होते. नमस्तुभ्यं म्हणजे 'आपणास माझा नमस्कार असो.' येथे भक्त आपल्या कुलदेवींसमोर नम्रतेन नतमस्तक होतो. अहंकार बाजूला ठेवून देवींच्या चरणी श्रद्धा आणि शरणागती व्यक्त केली जाते.

यानंतर 'कुलवृद्धि प्रदायिनी' असा उल्लेख



येतो. याचा अर्थ 'हे देवी, आमच्या कुलाची वृद्धी आणि प्रगती करणारी आपणच आहात.' येथे कुलवृद्धीचा अर्थ केवळ कुटुंबातील सदस्यसंख्या वाढणे असा मर्यादित नाही. त्यामध्ये कुटुंबाचे सुख, समृद्धी, संततीचे कल्याण, आर्थिक स्थैर्य, मान-सन्मान, संस्कारांची वृद्धी आणि पुढील पिढ्यांची प्रगती यांचा व्यापक अर्थ समाविष्ट होतो.

'कुल-काम प्रदे देवी' या चरणात भक्त आपल्या कुलाच्या योग्य आणि मंगल इच्छांची पूर्तता व्हावी, अशी देवींकडे प्रार्थना करतो. येथे काम म्हणजे केवळ भौतिक इच्छा नव्हे; तर कुटुंबाच्या हितासाठी असलेल्या योग्य आकांक्षा, उद्दिष्टे आणि कल्याणाची भावना होय. त्यामुळे हा मंत्र भक्ताच्या वैयक्तिक इच्छेपेक्षा संपूर्ण कुटुंबाच्या मंगलाचा संकल्प व्यक्त करतो.

शेवटी 'सदा मंगल कारिणी' असे म्हटले आहे. म्हणजे 'हे देवी, आपण सदैव मंगल आणि कल्याण करणारी आहात.' या चरणात एखादी एकच इच्छा पूर्ण व्हावी अशी अपेक्षा नसून, संपूर्ण जीवनात आणि कुलात शुभत्व, शांतता, सुख, संरक्षण आणि कल्याण कायम राहावे, अशी व्यापक प्रार्थना आहे.

या मंत्राचे आध्यात्मिक स्वरूप पाहिले तर त्यामध्ये चार सुंदर भाव एकत्र आलेले दिसतात नमस्कार, कुलवृद्धी, योग्य इच्छांची पूर्ती आणि सदैव मंगल. त्यामुळे हा श्लोक कुलदेवीच्या स्मरणासाठी अत्यंत भावपूर्ण प्रार्थना म्हणून म्हणता येतो.

महत्त्वाचे म्हणजे या प्रार्थनेचा आधार श्रद्धा, भक्ती आणि सद्भावना हा आहे. कुलदेवींचे स्मरण करताना आपल्या पूर्वजांचे स्मरण, कुटुंबाच्या कल्याणाचा संकल्प आणि चांगल्या आचरणाची भावना मनात ठेवणे अधिक अर्थपूर्ण ठरते.

**भावार्थ :** 'हे माझ्या कुलदेवी आपणास माझा श्रद्धापूर्वक नमस्कार. आमच्या कुलाची वृद्धी, प्रगती आणि समृद्धी करणारी आपणच आहात. आमच्या कुलाच्या योग्य इच्छा पूर्ण करा आणि आमच्या संपूर्ण कुटुंबावर सदैव आपले मंगलमय कृपाछत्र राहू द्या.'

# श्री माँ अवंतिका देवी : महाकाल की अधिष्ठात्री शक्ति

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उज्जैन की प्राचीन पहचान अवंतिका नगरी के रूप में रही है। इसी कारण यहाँ विराजमान माँ को अवंतिका देवी कहा जाता है। महाकालेश्वर मंदिर परिसर में, सभा-मंडप क्षेत्र में माँ अवंतिका का प्राचीन देवस्थान बताया जाता है। हाल के स्थानीय विवरणों में इसे महाकाल मंदिर के पालकी द्वार के समीप, श्रीराम मंदिर के पीछे स्थित बताया गया है।

**माँ अवंतिका किसका स्वरूप हैं ?**

माँ अवंतिका को आदिशक्ति का महाकाली/महाकालिका स्वरूप माना जाता है। शक्ति-परंपरा में उज्जयिनी के इस पीठ की अधिष्ठात्री देवी के नाम अवंती, अवंतिका या महाकाली मिलते हैं। विभिन्न शक्ति-पीठ परंपराओं में नाम और स्थान-विवरण में कुछ भिन्नताएँ भी मिलती हैं। एक प्रचलित शक्ति-पीठ मान्यता के अनुसार, यहाँ माता सती का ऊर्ध्व ओष्ठ (ऊपरी होंठ) गिरा था। इसी कारण यह स्थान शक्ति-उपासना से जुड़ा माना जाता है। उज्जैन की विशेषता यह है कि यहाँ महाकालेश्वर ज्योतिर्लिंग और शक्ति-परंपरा का अद्भुत संगम दिखाई देता है। स्वयं महाकालेश्वर मंदिर की आधिकारिक वेबसाइट उज्जैन को अत्यंत प्राचीन और मोक्षदायिनी नगरी के रूप में वर्णित करती है।

**माँ का आध्यात्मिक संदेश**

माँ अवंतिका को शक्ति, संरक्षण, निर्भयता और अधर्म-विनाश की देवी के रूप में भावपूर्वक पूजा जाता है। उनका महाकाली स्वरूप यह संदेश देता है कि समय और मृत्यु से भी परे परम शक्ति ही अंतिम सत्य है।

**ॐ क्रीं कालिकायै नमः।**
**गलद्रक्तमुण्डावलीकण्ठमाला**
**महाघोररावा सुदंष्ट्रा कराला।**
**विवस्त्रा श्मशानालया मुक्तकेशी**
**महाकालकामाकुला कालिकेयम्॥**

स्तुति माँ के उग्र महाकाली स्वरूप का ध्यान कराती है। वह शक्ति जो भय, अज्ञान और अधर्म का नाश करती है। कालिका अष्टक को महाकाली की स्तुति के रूप में परंपरागत रूप से गाया-पढ़ा जाता है।

एक सुंदर भाव-वाक्य

'जय माँ अवंतिका! अवंतिका नगरी की अधिष्ठात्री, महाकाल की पावन नगरी में विराजमान आदिशक्ति महाकाली माँ अपने भक्तों के भय का नाश करें, शक्ति प्रदान करें और जीवन में धर्म, साहस एवं कल्याण का प्रकाश भरें।'

**महत्वपूर्ण बात :** उज्जैन में हरसिद्धि माता और महाकाल परिसर की अवंतिका देवी को लेकर "शक्तिपीठ" संबंधी स्थानीय/पौराणिक दावे अलग-अलग परंपराओं में मिलते हैं; इसलिए दोनों को एक ही मंदिर या एक ही परंपरा मानना उचित नहीं है।



# बाळाच्या जन्मानंतर ५ व्या दिवशी 'सटवाईची पूजा' का करतात ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरात नवा पाहुणा येणे, तसेच बाळाचा जन्म होणे ही कोणत्याही कुटुंबासाठी आनंदाची बाब असते. मुलाचा जन्म झाला की कुटुंबाच्या विविध परंपरा असतात, त्या पाळल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे बाळाच्या जन्माच्या पाचव्या किंवा सहाव्या दिवशी सटवाई देवींची पूजा केली जाते. काही ठिकाणी लोकपरंपरेनुसार मुलाच्या जन्मानंतरचा सहावा दिवस हा अनेक कुटुंबांसाठी विशेष मानला जातो. या दिवशी सटवाई देवींची पूजा करण्याची महाराष्ट्रातील अनेक भागांत प्राचीन लोकपरंपरा आहे. नेमकी काय आहे ही परंपरा ? बाळाच्या जन्मानंतर ५ व्या दिवशी का केली जाते सटवाई देवींची पूजा ? मुलांचे भाग्य लिहिणारी देवी नेमकी कोण ? सर्व काही जाणून घ्या.

## सटवाई देवी कोण आहेत ?

लोकमान्यतेनुसार सटवाई देवी नवजात बालकाच्या आयुष्याचे रक्षण करणाऱ्या आहेत. बाळाच्या जन्मानंतर ५ व्या दिवशी रात्री ती येतात आणि बाळाचे भाग्य लिहितात, अशी श्रद्धा अनेक ठिकाणी प्रचलित आहे. त्यामुळे या दिवसाला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. धार्मिक श्रद्धेनुसार बाळाच्या जन्मानंतर सहाव्या दिवशी 'सटवाई देवींची पूजा' किंवा 'सहावी' करण्याची प्रथा आहे. या दिवशी बाळासाठी विशेष नैवेद्य तयार केला जातो. काही ठिकाणी पाटावर कागद, लेखणी आणि इतर साहित्य ठेवले जाते. सटवाई देवी बाळाचे भविष्य लिहितात, असा लोकविश्वास यामागे आहे.

## बाळाच्या भविष्यासाठी केली जाते प्रार्थना

धार्मिक श्रद्धेनुसार सटवाई देवींच्या पूजेदरम्यान नवजात बाळाला दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि उज्ज्वल भविष्य लाभावे, अशी प्रार्थना केली जाते. कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती या विधीचे महत्त्व पुढील पिढीला सांगतात.

## सटवाई देवींची पूजा कशी करतात ?

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बाळाच्या जन्मानंतर ५ व्या दिवशी सटवाई देवींची पूजा करण्याची लोकपरंपरा अनेक ठिकाणी आढळते. मात्र पूजा करण्याची पद्धत कुटुंब, गाव आणि समाजाच्या परंपरेनुसार थोडी वेगळी असू शकते.




* घरातील पूजा करण्याची जागा स्वच्छ करून रांगोळी काढली जाते.
* पाट किंवा चौरंग ठेवून त्यावर सटवाई देवीचे प्रतीक/प्रतिमा स्थापित केली जाते.
* देवींसमोर हळद-कुंकू, अक्षता, फुले, दिवा आणि धूप ठेवला जातो.
* काही कुटुंबांत कागद आणि लेखणी ठेवण्याची प्रथा आहे. लोकश्रद्धेनुसार या दिवशी सटवाई देवी बाळाचे भाग्य लिहितात.
* बाळाला स्वच्छ कपडे घालून देवींसमोर ठेवून त्याच्या आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुखी भविष्यासाठी प्रार्थना केली जाते.
* देवींना नैवेद्य दाखवला जातो. नैवेद्याचा प्रकार स्थानिक परंपरेनुसार बदलतो.
* कुटुंबातील महिला देवीची आरती करून ओटी भरतात, अशीही काही ठिकाणी प्रथा आहे.
* पूजा पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांना प्रसाद दिला जातो.

## सटवाई देवींची लोककथा, कोण आहेत या देवी ?

सटवाई देवींच्या लोककथेनुसार एकदा एका गरीब कुटुंबात मुलाचा जन्म झाला. घरात आनंदाचे वातावरण होते. बाळाच्या जन्मानंतर त्याची आई आणि आजी त्याची काळजी घेत होत्या. बाळाच्या जन्माचा सहावा दिवस जवळ आला. लोकमान्यतेनुसार त्या रात्री सटवाई देवी बाळाचे भविष्य लिहिण्यासाठी येतात. त्यामुळे घरातील मंडळींनी त्या रात्री घर स्वच्छ केले, दिवा लावला आणि देवींसाठी पाटावर कागद आणि लेखणी ठेवली. मध्यरात्री सटवाई देवी त्या घरात आल्या. त्यांनी बाळाकडे पाहिले आणि त्याच्या कपाळावर हात ठेवला. त्याचे आयुष्य, सुख-दुःख आणि भविष्यातील घटना त्या लिहू लागल्या, अशी लोककथा सांगितली जाते. घरातील लोकांनी देवींकडे बाळाला आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुखी जीवन देण्याची प्रार्थना केली. देवींनी बाळाला आशीर्वाद दिला आणि सांगितले, की माणसाचे आयुष्य केवळ नशिबाने नाही तर त्याच्या कर्मांनीही घडते. पहाट झाल्यावर देवी निघून गेल्या. त्यानंतर बाळाच्या सहाव्या दिवशी सटवाई देवींची पूजा करण्याची परंपरा रूढ झाली, अशी लोकमान्यता काही भागांत सांगितली जाते.

## सटवाई देवींबाबत अनेक लोककथा

महाराष्ट्राच्या विविध भागांत सटवाई देवींबाबत वेगवेगळ्या कथा आणि प्रथा आढळतात. काही ठिकाणी सटवाईला देवी पार्वतीचे रूप मानले जातात, तर काही लोकपरंपरांमध्ये त्यांना स्वतंत्र ग्रामदेवता किंवा बालरक्षण करणारी शक्ती मानले जाते. महत्त्वाचे म्हणजे सटवाई देवींशी संबंधित 'बाळाचे भाग्य लिहिणे' ही धार्मिक लोकश्रद्धा आहे. त्यांची पूजा-पद्धती आणि कथा प्रदेशानुसार बदलू शकते.

## श्रद्धा आणि परंपरेचा सुंदर संगम

आजच्या आधुनिक काळातही अनेक कुटुंबे सटवाई देवींची पूजा करून ही परंपरा जपताना दिसतात. नवजात बाळाच्या आयुष्याची सुरूवात आनंद, आशीर्वाद आणि मंगलकामनांनी व्हावी, या भावनेतून ही परंपरा आजही श्रद्धेने पाळली जाते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**